Impact Factor 5.307 (SJIF)

RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal

ISSN 2582-9173

# महात्मा गांधी आणि त्याचे विचार

**डॉ ममता राममिलन साहू**
स्व वसंतराव कोल्हटकर कला महाविद्यालय, रोहणा
मो.नं. - 77 98110699
ईमेल - mamtadsahu26@gmail.com

---

**प्रस्तावना :**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ रोजी गुजरात मधित पोरबंदर या गावा मध्ये झाला. गांधीजींनी बैरिस्टर ही पदवी मिळवली. त्यांनी आपल्या जीवनात सत्य, अहिंसा, नैतिकता यांना महत्व दिले. गांधीजी च्या जीवनावर गीतेचा प्रभाव असल्यामुळे त्याने आपले संसारिक जीवन त्यागून त्यांनी देशासाठी, समाजासाठी व पिडीत लोकांसाठी कार्य करण्यास प्रारंभ केला व मनभर बोलण्या पेक्षा कणभर करून दाखवने श्रेष्ठ असते या कृतीतूनच महात्मा गांधी यांचे अनेक विचार पुढे आले त्यांची ती विचारधारा पुढील प्रमाणे आहे

**1. सत्याग्रह :**

गांधीजी नी सत्यासाठी आयुष्य वेचले त्यांनी असत्य ला आपल्या जीवना मध्ये स्थान दिला नाही. महात्मा गांधी यांनी जगाला एक मोठी देणगी दिली ती म्हणजे सत्याग्रह होय . सत्याग्रह महणजे सत्याचा आग्रह धरणे होय. सत्याग्रह चा मूलभूत आधार सत्य व अहिंसा ही तत्वे आहेत . गांधीजींच्या या सत्याग्रहाचा अवलंब जगातील अनेक राष्ट्राने केलेला दिसून येतो. गांधीजी नी शेवटच्या क्षणापर्यंत सत्याग्रहाला अनन्य साधारण महत्व दिले. त्यांच्या सत्याग्रहचा वापर विनोबा भावे यांनी केलेला दिसून येतो. आज अण्णा हजारे गांधीजीच्या विचार प्रणाली पुढे चालवत आहे. सत्याग्रहा मध्ये असहकार, सविनय कायदेभंग, उपोशन हरताळ, हिजरत, बहिष्कार धरणे इत्यादि साधनांचा वापर केला जातो.

**२. स्वदेशी :**

महात्मा गांधी यांनी ब्रिटीशां ना विरोध करण्यासाठी व भारतिय लोकांना आपल्या देशा बद्दल आस्था व देशातील लघु उद्योगाला प्रोत्साहन मिळण्यासाठी स्वदेशी या विचारांचा अवलंब केला. महात्मा गांधी यांनी देशातील प्रत्येक नागरिकांल स्वदेशी चा आग्रह धरला आणि ती प्रत्येक नागरिकांनी अंगीकारली या साठी प्रचार - प्रसार केला भारतियांनी प्रत्येक वस्तू भारतिय बनावटीची वापरली तर भारताची आर्थिक स्थिती बळकट होईल. प्रत्येकांच्या हाताला काम मिळेल आणि परदेशात जाणारा पैसा भारतामध्ये गुंतवला जाईल या मुळे भारत हा आर्थिक स्वावलंबन कडे वळेल कारण ब्रिटिशांनी ज्या वस्तू भारतात विकल्या त्यामुळे भारतात वस्तू निर्माण वर मर्यादा आल्या. त्यातून उद्योग बंद पडले व बेकारी निर्माण झाली ही बेकारी कमी करून लघू व कुटीर उद्योगत वाढ करून भारताला आर्थिक संपन्न राष्ट्र म्हणून सम्पन्न राष्ट्र म्हणून पुढे येण्यास संधी आहे म्हणून स्वदेशीचा गांधीजीनीं अंगीकार केला.

**3. सर्वोदय :**

सर्वोदय या संकल्पनेचा अर्थ सर्वांचे कल्याण असा आहे. भारतात वेगवगळ्या जाती, धर्माचे, सुवर्ण व दलित, उच्च व निम्न, गरीब व श्रीमंत या द्ऱ्या निर्माण झाल्या आहेत. ही दरी नष्ट करून समाजातील सर्व घटकांचे कल्याण व्हावे यासाठी सर्वोदय ही संकल्पना अंगिकारली या सर्वोदयाच्या संकल्पनेत महात्मा गांधी यांना सर्व जनतेचे कल्याण शेतकरी, कामगाराचे हिंत, तसेच घरकाम करणारी व्यक्ति असो की मोठ्या - धंधावर असणारी व्यक्ति यांचे काम समान त्यामुळे त्यांच्या कामाचे मूल्य ही समान असले पाहिजे. या मध्ये प्रत्येक व्यक्तिला आपल्या गरजा पूर्ण करण्याची समान संधी मिळाली पाहिजे. सवांद् च्या माध्यमातून परिवर्तन घडून येईल. सर्वांच कल्याण होईल. यातून दारिद्रय, बेकारी मुक्त राष्ट्र निर्माण होईल. म्हणजेच भारतातील सर्व समाजाचा सर्वागिंण विकास करणेआहे .

**4. सत्य आणि अहिंसा :**

गांधीजी म्हणतात आत्मशुद्धी खेरीज जीवन मंत्र बरोबर ऐक्य साधता येत नाही. आत्मशुद्धी खेरीज अहिंसा धर्माचे पालन अशक्य आहे. अशुद्ध आत्मा परमात्म्याचे दर्शन करू शकत नाही. अर्थात जीवन मंत्र ची सर्व आत्मानं शुद्धी ची आवश्यकता आहे. अहिंसा म्हटले की हिंसा न करणे असा अर्थ घेतला जातो. पण गांधीना अभिप्रेत असलेली अहिंसा वेगळी आहे कोणाचे ही मन न दुखवणे. राग, लोभ, स्वार्थ या द्वारे इतरांनी शारीरिक व मानसिक दुखापत न करणे अर्थात काया, वाचा व मन या द्रवार इतरां ना त्रास न देणे म्हणजे अहिंसा होय यामुळे देशात वाद, तंट्टे होणारे नाहीत. अहिसा सांगतांना गांधीजींनी तीन माकडाची कथा सांगितली आहे वाईट न बोलणे, वाईट न पाहणे वाईट न ऐकणे म्हणजेच माणूस अहिंसा मार्गाच अवलंब करणे होय.

**5. ग्रामोद्योग :**

गांधीजीनी खेड्या कडे चला असे म्हटले होते . कारण गांधीजींना खेडी स्वयंमपूर्ण व समृद्ध करायची होती म्हणून त्यांनी ग्रामोद्योगांची संकल्पना मांडली . चरख्या द्रवारे सूत तयार करणे , कपडे बनविणे, गावांत लागणाऱ्या प्रत्येक वस्तुची निर्मिती ग्रामिण भागातच करण्यासाठी त्यांची मुळ उद्योगी शिक्षण व्यवस्था मांडली व ती प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रयत्न केले . यातून खेड्यात अनेक उद्योग निर्माण झाले ग्रामिण भागात शेती बरोबरच, पशुपालन, दुग्ध व्यवसाय, खत निर्मिती इत्यादि व्यवसाय निर्माण करून ग्राम उद्योगाला चालना दिली.

**6. विश्वस्थ संकल्पना :**

समाजातील विषमतेची दरी नष्ट करण्यासाठी गांधींजीनी अपरिग्रह या तत्वाचा स्वीकार केला. अपरिग्रह म्हणजे संग्रह न करणे. म्हणजेच कोणत्याही व्यक्ति, धन किंवा संपत्तीचे संग्रह न करता स्वतःला मालक न मानता तेवढी खाजगी मालमत्ता आपल्याकडे ठेवावी व बाकीची खाजगी मालकीला परवानगी देईल. भांडवलदार विश्वस्थ असल्यास श्रमिक कामगार यांचे हित जोपासले जाईल. प्रत्येकाला आपला आर्थिक विकास करण्यास संधी मिळेल यातून आर्थिक स्वातंत्र्य निर्माण होईल व समाज आर्थिक दुष्टया समृद्ध होईल.

**7. श्रम प्रतिष्ठा :**

भारत हा देश श्रमप्रधान खेड्याच देश म्हणून या देशांची किती लोकोत्तर पसरली आहे . म्हणूनच महात्मा

गांधी यांनी श्रमाला उच्च कोटीचे महत्व दिले होते कारण श्रम शिवाय व्यक्ति चे भाग्य घडू शकत नाही. कोणत्याही कामाला कमी न लेखता श्रम करत राहणे म्हणजे विकासाकडे वाटचाल करणे होय. श्रम हे कोणत्याही बेकाराच्या भांडवला पेक्षा कमी नाही म्हणून श्रमाची पूजा करावी. त्यामुळे व्यवहार चांगली चालतो, आरोग्य उत्तम राहते . श्रम करणे हे प्रत्येक व्यक्तीचे प्रथम कर्तव्य आहे. प्रत्येकांने आपले कर्तव्य पार पाडल्यास आपल्या बरोबरच देशाचा विकास होतो. म्हणून श्रम प्रतिष्ठा निर्माण करणे काळाची गरज असल्याचे महात्मा गांधीजी नी सांगितले आहे.

महात्मा गांधी यांनी जे विचार मांडले या वरून असे लक्षात येते की, सर्व स्तरातील व्यक्ति व समाजाला एकत्र आणून समानतेच्या तत्वाने नांदवायचे असेल किंवा विषमतेची दरी कायम ची मिटवायची असेल तर स्वदेशी, सत्याग्रह या सारख्या साधनांचा वापर करावे लागेल या साठी गांधीजी नीं आपल्या विचारधारेत वरील विचारांना प्राधान दिले आहे.

**संदर्भग्रंथ :**


- डॉ. अरविंद श्रृंगारपूरे, समग्र भारतीय व पाश्चात्य राजकीय विचारवंत, विधा प्रकाशन, नागपूर
- र. घ. वराडकर, भारतीय राजकीय विचारवंत, विद्य प्रकाशन, नागपूर
- डॉ. डी. आर : तांदळे, प्रा. एस. ई . बिराजदार, डॉ. नवनाथ आघाव , भारतीय विचारवंत
- डॉ . व्ही जी कुलकर्णी, प्रा . कांत सोमवंशी, भारतीय राजकीय विचारवंत, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद
- प्राचार्य डॉ. पी डी. देवरे, डॉ. डी. एस. निकुंभ, भारतीय राजकीय विचार, प्रशांत पब्लिकेशन जळगांव